हिंदी /मराठी साप्ताहिक

पोलीसनामा

वर्धा - मंगळवार - दि. १२ ऑगस्ट २०२५



**नगर पंचायत सेलू जिल्हा वर्धा**

Email-Id- npseloo@gmail.com

पत्र क्र. जा.क्र./नपसे/सामान्य प्रशासन/ 580/2025

दिनांक : 11/08/2025

जाहीर सुचना
'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५'
अधिनियम अंतर्गत विविध लोकसेवा
अधिसूचित सेवा देणे बाबत.

सर्व नागरिकांना, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, वाणिज्य संस्था तसेच सर्व राजकीय पक्ष, शासकीय व निमशासकीय कार्यालय तसेच केंद्रीय कार्यालय यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, लोकसेवा हमी कायद्यांतर्गत नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे एकूण ६७ सेवाची यादी प्रसिध्द केलेली आहे. तसेच वेळोवेळी नवीन लोकसेवा यादी प्रसिध्द करून नगर प्रशासन विभागाला दिली जाते. त्यानुसार सर्व पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित सेवा देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ कलम ३ नुसार विहित नमुन्यात अर्ज मुदतीत दिली जाते. याकरिता मुख्याधिकारी, नगर पंचायत, सेलू तर्फे जनमाहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशीत करण्यात आलेले आहे.

तरी नगर विकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे विहित कलेल्या सेवांची यादी नगर पंचायत, सेलू मध्ये दर्शनीय स्थळी व वेब पोर्टल वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

मुख्याधिकारी
नगर पंचायत सेलू

## एसटी बसच्या धडकेत मोटरसायकलस्वार युवक जागीच ठार

कळंब

तालुक्यातील पोटगव्हाण येथिल युवक समिर दशरथ उईके (२०) या आदिवासी मुलाला आदिवासी दिनीच एसटी बस क्रमांक एम एच ४०/सीएम ५२८२ च्या चालकाने समोरासमोर मोटरसायकल क्रमांक एम एच २९/सीएच ४६०९ ला जबर धडक दिल्याने रक्ताच्या थारोळ्यात जागीच ठार झाल्याची घटना घडली.

विज पुरवठा खंडीत राहात असल्याने पिठगिरणी बंद असल्या की नांझा गावाला दळण दळण्यासाठी पिठ गिरणीवर यावे लागते अशाच प्रकारे जागतिक आदिवासी दिनी आदिवासी युवक समिर उईके पोटगव्हाण येथुन नांझा येथे दळण घेऊन पिठगिरणीवर येत असता नांझा–पोटगव्हाण एस टी बसने खडकी फाट्याजवळ समोसमोर मोटरसायकलला जबर धडक दिल्याने सम्यक रोडवर पडून रक्ताचे पाट वा. हून जागीच ठार झाला.

विशेष म्हणजे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांचे पोटगव्हाण दत्तक ग्राम असून गावात नेहमीच विज पुरठा खंडीत रा. हतो कुणी राजकीय नेता, अधिकारी याकडे लक्ष देत नसल्याने ग्रामस्थांना यातना भोगाव्या लागतात. मृतकचे वडील दशरथ गोविंदा उईके यांनी कळंब पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली.

# वंदे भारत ट्रेनचा विदर्भातील नागरिकांना फायदा होणार – पालकमंत्री डॉ.पंकज भोयर

**नागपूर-पुणे वंदे भारत एक्सप्रेसचा प्रधानमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ**

**वर्धा स्थानकावरून ट्रेनला पालकमंत्र्यासह खासदारांनी हिरवी झेंडी दाखवून केले रवाना**

वर्धा,

विदर्भातील युवक, विद्यार्थी मोठ्या संख्येने रोजगार व शिक्षणासाठी पुणे येथे जात असतात. विदर्भातील जनतेची मागणी होती पुणे येथे जाण्यासाठी वंदे भारत ट्रेन सुरू करावी. विकसित भारताला आधुनिक प्रवासाची भेट प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाठपुरावा करुन विदर्भातील जनेतेसाठी वंदे भारत ट्रेन सुरू केली. आता विदर्भातील पुणे येथे जाणाऱ्या जनतेला प्रवासाचा फायदा होणार आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे नागपूर–पुणे वंदे भारत एक्सप्रेसचा हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात आला. या निमित्ताने वर्धा रेल्वे स्थानकावरील फलाट क्रमांक दोनवर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. खासदार अमर काळे, माजी खासदार रामदास तडस, जिल्हाधिकारी वान्मथी सी., पोलिस अधीक्षक अनुराग जैन, मध्य रेल्वे नागपूरचे एडीआरएम अरुण कुमार, रवी शेंडे, संजय गाते यांच्यासह



रेल्वे विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

वंदे भारत रेल्वे म्हणजे विकसित भारताला आधुनिक प्रवासाची दिलेली भेट आहे. पुण्याला जाणाऱ्या नागरिकांचा प्रवास सुखकर होणार आहे. वंदे भारत रेल्वेचा शेगाव येथे थांबा देण्यात आला असून जिल्ह्यातील नित्य क्रमाने शेगाव येथे जाणाऱ्या भाविकांना सुध्दा मोठा लाभ होणार आहे. जिल्ह्यात मागील दहा वर्षाच्या काळात रेल्वे स्थानकाच्या नुतनीकरणाचे मोठे काम झाले आहे. अनेक क्रांतीकारी निर्णय, योजना नवीन कामे देशाच्या विकासासाठी केल्या जात असल्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले.

खासदार अमर काळे म्हणाले, अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी, रोजगारासाठी पुण्याला जातात. बरेच दिवासांची वंदे भारत रेल्वे सुरू करण्याची मागणी होती. आज ती पूर्ण झाली त्याबद्दल रेल्वे मंत्र्यांचे मी आभार मानतो. प्रवास आता अधिक वेगाने व सुखकर होणार आहे. कोरोना काळात जिल्ह्यातील अनेक थांबे बंद करण्यात आले होते. त्यापैकी काही थांबे सुरू व्हायचे आहेत, त्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले.

सुरुवातीला रेल्वे स्थानकावर वंदे भारत ट्रेनचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. त्यांनतर लोकोपायलट यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आला. पालकमंत्र्यांच्या हस्ते निबंध लेखन व चित्रकला स्पर्धेत विजयी विद्यार्थ्यांना बक्षिस वितरण करण्यात आले.

वंदे भारत रेल्वे विषयी सप्ताहातून सहा दिवस नागपूर ते पुणे वंदे भारत रेल्वे सेवा सुरू असणार आहे. नागपूर ते पुणे 881 किमी अंतर कापेल. ही रेल्वे नागपूर वरुन सुटल्यानंतर वर्धा, बडनेरा, अकोला, शेगाव, भुसावळ, जळगाव, मनमाड, कोपरगाव, अहिल्यानगर आणि दौंड स्थानकांवर थांबा असेल. पुणे येथे जाण्यासाठी 12 तासांचा कालावधी लागेल. ही ट्रेन संपूर्ण वातानुकूलित असून एसी चेअर कार आणि एक्झिक्युटीव्ह एसी चेअर उपलब्ध असतील. नागपूर ते पुणे प्रवास पुर्वीपेक्षा जलद गतीने होणार आहे.